


# श्रीचैतन्यलीला धाम

## नवद्वीप



REFBK-0012200

## सांस्कृतिक भारत दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22120
क्रमांक २०४
REFBK-0012200
12200

# श्रीचैतन्यलीलाधाम

## न व द्वी प

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

श्री : ३१९ [ ६-६१ ]

© १९६१
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि, मुंबई.

आवृत्ति पहिली : १९६१

किंमत ८० नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २.



मुद्रक :
ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८, नारायण पेठ,
पुणें २.

# श्रीचैतन्यलीलाधाम

## नवद्वीप

द्वितीय वृंदावन :

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२२००

> कालान्नष्टं भक्तियोगं निजं यः
> प्रादुष्कर्तुं कृष्णचैतन्यनामा ।
> आविर्भूतस्तस्य पादारविन्दे
> गाढं गाढं लीयतां चित्तभृंगः ॥

भारताच्या इतिहासात भगवद्भक्तीच्या भावसागराचीं विविध आंदोलनें अनेकदा घडून आलीं तेराव्या शतकांत महाराष्ट्रांत घडलेलें भक्तिआंदोलन भक्तिसागराच्या लाटांना पंजाबपर्यंत पोंचविण्याइतपत प्रबळ आणि व्यापक ठरलें. तसेंच व्यापक आंदोलन पंधराव्या शतकात उत्तर भारतात घडून आलें. आणि या काळात भगवान् श्रीकृष्णाची लीलाभूमि मथुरा-वृंदावन भक्तीचें प्रबल केन्द्र बनली परंतु या कार्यास सर्वांत अधिक प्रेरणा मात्र गौरांगप्रभु श्रीकृष्णचैतन्यांपासून मिळाली सामान्य जनतेचें जीवन प्रभावित करणारें जनतेचेंच महान् भक्ति-आंदोलन निर्माण करून समग्र उत्तर भारतास — विशेषतः बंगाल व ओरिसा राज्यास — भक्तिरसांत डुंबवून टाकण्याचें मुख्य श्रेय महाप्रभु श्रीचैतन्य यांसच देण्यात येतें. भक्तिरसाची जीवित मूर्ति, उदात्त मधुरभावाचें जाज्वल्य प्रतीक गौरांगप्रभु श्रीकृष्णचैतन्यदेव यानीं **नवद्वीपांत** जन्म ग्रहण केला आणि वैष्णव धर्माच्या महान् उत्थानाचा प्रारंभहि येथेंच केला त्यांच्या जीवितकालातच भक्तजन त्यास भगवान् श्रीकृष्णाचा अवतार समजूं लागले विशेषतः राधा-कृष्णाचा संमीलित युगलावतार म्हणून त्याची ख्याति झाली म्हणूनच त्याची विहारभूमि नवद्वीप यास पूर्वेकडील अपर वृंदावनाचें माहात्म्य प्राप्त झालें.

स्थान-परिचय :

नवद्वीप किंवा नदिया या दोन्ही नांवांनीं ओळखलें जाणारें हें पुण्यस्थल बंगाल राज्यांतील नदिया जिल्ह्याचें मुख्य शहर आहे तें भागीरथी नदीच्या पश्चिम तीरावर वसलेलें असून धार्मिक यात्रिकांस ' नवद्वीप धाम ' या नांवानें अधिक परिचित आहे

नवद्वीप म्हणजे नऊ बेटांचा समाहार. स्वर्धुनि गंगेच्या शाखा व उपनद्या यांनीं बनलेलीं हीं नऊ द्वीपें आज मात्र केवळ नावानींच माहीत आहेत अंतर्द्वीप, सीमंतद्वीप, गोद्रुमद्वीप, मध्यद्वीप, कोलद्वीप, ऋतुद्वीप, जन्हुद्वीप, मोहद्रुमद्वीप आणि रुद्रद्वीप अशीं तीं नऊ द्वीपें होत नद्यांच्या जाळ्यानी निर्माण झालेले हे स्वतंत्र नऊ भूविभाग कदाचित् एकशासित प्रदेश असल्यानें त्याची संहिति नवद्वीप या एकवचनी नांवानें उल्लेखिली जाऊ लागली असावी

आजचें नवद्वीप एक छोटें नगर असलें, तरी प्राचीन नवद्वीप नगराचा घेर सोळा कोसांचा होता असें सांगतात नंतरच्या काळांत त्याचा बहुतांशीं भाग गंगेने आपल्या विशाल उदरात सामावून घेतला त्यामुळेंच प्राचीन नवद्वीपातील विशिष्ट पुण्यस्थळांच्या आजच्या निश्चित स्थानासंबंधीं एकवाक्यता दिसत नाहीं. गौडीय मठाचे संस्थापक श्रीभक्तिविनोद ठाकूर यांच्या मतेंहि वर्तमान नवद्वीप हें नवद्वीप नसून मायापूर हेंच खरें ' नवद्वीप धाम ' होय त्याच्या मतें आजचें नवद्वीप हें पूर्वीचें रामचंद्रपूर होय या मायापुरास जाण्यासाठीं ' नवद्वीप धाम ' येथून गंगा उतरून पलीकडे जावें लागतें वर निर्देशिलेल्या नऊ द्वीपापैकीं काहींचीं नावे धारण करणारीं स्थळें आजाहि जवळपास आहेत सीमन्तद्वीप, गोद्रुमद्वीप, माजदा ( मध्यद्वीप ) आणि कुलिया ( कोलद्वीप ) हीं तशीं स्थानें होत

मायापुराच्या गौडीय मठाचे अनुयायी वगळल्यास श्रीचैतन्यप्रभूंचे अनुयायी मात्र वर्तमान नवद्वीपासच ' नवद्वीप धाम ' समजतात धार्मिक यात्रिकांचीं महत्त्वाचीं श्रद्धा-मंदिरें येथेंच आहेत

## महान् तीर्थस्थान :

भागीरथीच्या तीरावर हें क्षेत्र असल्यानें त्याचें तीर्थमाहात्म्य स्वतन्त्रपणें न सागतांहि समजणारें आहे. नदिया जिल्ह्याचा साराच भू-प्रदेश सुरसरित् गंगेच्या पवित्र उपनद्यांनीं व्यापलेला आहे. बंगाल्यांत गंगेच्याच दोन प्रधान धारा पद्मावती व भागीरथी या स्वतंत्र नांवांनी सागरास मिळतात. नवद्वीपावरून 'भागीरथी' नामक मूळ गंगेचीच धारा वहात जाऊन गंगासागरास मिळते.

साक्षात् विष्णुपादोदकापासून निर्माण झालेली आणि महेश्वरानें मस्तकीं धारण केलेली गगा ' प्रधान सर्वतीर्थानाम् ' म्हणून पं जगन्नाथानें स्तवली असून महाभारतातहि –

**' न गङ्गासदृशं तीर्थं न देवः केशवात् परः '**

या शब्दात तिचें तीर्थमहिमान सागितलेलें आहे

पावन नदी, सरोवर अथवा सागर यांच्या तीरावरील पवित्र यात्रा-केंद्रास सामान्य अर्थानें तीर्थ ही संज्ञा आहे तरीहि तपोराशि ऋषि-मुनींचा अथवा परम भगवद्भक्तांचा संपर्कच अशा स्थानास तीर्थत्व देत असतो.



वैष्णव सकीर्तन ( प्राचीन चित्रावरून )

नवद्वीप या सर्व अर्थांनीं महान् तीर्थ आहे. पुण्यतोया भागीरथीचा पावन तीर-प्रदेश, कृष्णावतार गौरागप्रभूंची लीलाभूमि, परम भागवताचें

निवासस्थान आणि आराध्यदैवतांचीं मंदिरें ! या सर्व कारणांमुळेंच 'नवद्वीप धाम' वैष्णवाचें परम महातीर्थ गणलें जातें

**पूर्वेतिहास :**

वस्तुत: नवद्वीप हें ऐतिहासिक शहर आहे. **पाल** राजांच्या निवासस्थानाचे भग्न अवशेष आजहि येथें पहावयास मिळतात. वंग देशाच्या सुप्रसिद्ध सेनवंशीय राजाचें तर हें राजधानीचें शहर होते इ सनाच्या बाराव्या शतकात **सेन** राजानीं आपली राजधानी गौरहून येथें आणली. भागीरथीच्या प्रसन्नपावन सान्निध्यासाठीं महाराजा लक्ष्मण-सेनानें आपला राजप्रासाद ऐन गंगातीरीं बांधला होता त्याचेहि अव-शेष येथें दाखविण्यांत येतात याच लक्ष्मणसेनानें आपल्या पित्याच्या स्मरणार्थ विशाल तलाव बांधला त्याच्या पित्याचे नांव बल्लाळसेन. म्हणून या तलावासहि '**बल्लाळ दिघी**' म्हणतात या तलावासच पवित्र तीर्थकुंडाचें महत्त्व प्राप्त होऊन हलीं त्यास '**पृथुकुंड**' म्हणूनहि संबोधण्यात येतें. नवद्वीप धामाहून गंगा पार करून 'मायापूर' भागात गेल्यावर तेथें पहावयास मिळणारें हें 'पृथुकुंड' आजहि गुणज्ञ सेन सम्राटाच्या स्मृति जागवीत आहे

**बल्लाळसेन** मोठा विद्यासंपन्न राजा असून अनेक धर्मशास्त्रीय ग्रंथांचा कर्ता म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे 'आचारसागर', 'प्रतिष्ठासागर', 'दानसागर' आणि 'अद्भुतसागर' ह्या ग्रंथाची त्यानें रचना केली. 'अद्भुतसागर' हा त्याचा अखेरचा ग्रंथ अपूर्ण राहिला, तो पित्याचें धवल यश वृद्धिंगत करणाऱ्या त्याच्या कीर्तिशाली पुत्रानें — सम्राट् लक्ष्मणसेनानें — पूर्ण केला

विद्यासंपन्न व गुणज्ञ **लक्ष्मणसेनानें** आपल्या राजसभेंत अनेक विद्वद्रत्नांचा संग्रह केला होता 'ब्राह्मणसर्वस्वा' सारख्या विख्यात धर्मग्रंथाचा कर्ता महापंडित **हलायुध**, 'गीत-गोविंद' काव्यानें रसिक-हृदयांवर मोहिनी टाकणारा **जयदेव**, 'पवनदूता'चा कर्ता **धायी**, आणि कविवर **उमापति** यांनीं व यांच्यासारख्या अन्य कवि-पंडितादींनीं लक्ष्मण-सेनाची राजसभा विलसत होती

परतु थोड्याच अवधीनंतर जगज्जयी इस्लामी आक्रमणानें येथील हिंदु साम्राज्याचाहि ग्रास घेतला सेन नृपांस विक्रमपुरास स्थलांतर करावें लागलें. इ. स ११९८ पासून इ स. १७५७ च्या प्लासीच्या युद्धापर्यंत नवद्वीप इस्लामांच्याच शासनाखालीं होतें. पण आश्चर्य असें कीं, ज्यांच्या पाशवी आक्रमणांनीं नालंदा, विक्रमशीला यांसारखीं महान् विद्यापीठें धुळीला मिळविलीं, त्याच्याच शासनकालांत नवद्वीप येथील विद्यापरंपरा कायम राहिली, एवढेंच नव्हे, तर ती उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊन इसवी सनाच्या चौदाव्या व पंधराव्या शतकात नवद्वीप पूर्व भारतांतील महान् विद्यापीठ गणलें जाऊं लागलें.

## नव्य न्यायाचें विद्यापीठ :

संस्कृत विद्येचें अध्ययन-अध्यापन नवद्वीपांत पूर्वापार चालत आलेले होतेंच तथापि येथील बुद्धिमान् विद्यार्थ्यांस विशिष्ट विद्या-शाखाच्या पारंगततेसाठीं मिथिला, काशी, विक्रमशीला यांसारख्या दूरच्या विद्यापीठाचा आश्रय घ्यावा लागे. मिथिला विद्यापीठ हें तर न्याय-दर्शनाचें सर्वश्रेष्ठ विद्यापीठ गणलें जाई तथापि नवद्वीपाच्या एका महान् सुपुत्रानें आपल्या प्रकाण्ड पांडित्यामुळें आपल्या जन्मभूमीस पूर्वेकडील महान् विद्यापीठाचें गौरवस्थान प्राप्त करून दिलें आणि मिथिलेच्या विद्यापीठाहूनहि नवद्वीपाची नव्य न्यायाचें महान् विद्यापीठ म्हणून अधिक ख्याति झाली.

नवद्वीपास हा गौरव **वासुदेव सार्वभौम** यानें प्राप्त करून दिला. यानें आपल्या जन्मभूमींत उपलब्ध होणारें ज्ञान संपादन केलें आणि वयाच्या पंचविसाव्या वर्षीं न्यायशास्त्राचें अधिक अध्ययन करण्यासाठीं मिथिलेस जाऊन विख्यात् पंडित पक्षधर मिश्र यांचें शिष्यत्व स्वीकारलें. परिन्यायशास्त्र म्हणजे भारतीय तर्कशास्त्र न्यायाच्या जुन्या प्रणालींत षोडश पदार्थांच्या विवेचनास प्राधान्य होतें पण गंगेशानें 'तत्त्वाचिंतामणि' ग्रंथ लिहून प्रमाणमीमासात्मक नवी धारा सुरू केली होती. म्हणूनच मिथिला नव्य न्यायाचें प्रधान पीठ मानलें जात होतें. तथापि वासुदेव मिथिलेस आला त्या वेळीं मिथिलेच्या पंडितांत गर्वभावनेमुळें संकुचित स्वार्थवृत्तींचा उदय झाला होता ते अध्ययनास येणाऱ्या विद्यार्थ्यांस

न्यायग्रंथाच्या प्रति करून घेण्यासाहि अनुज्ञा देईनासे झाले होते. कुशाग्रबुद्धि वासुदेवानें पक्षधर मिश्राजवळ न्यायाचे सांग अध्ययन करून 'सार्वभौम' ही पदवी संपादन केली खरी, पण 'न्यायकुसुमांजलि' व 'तत्त्वचिंतामणि' हे जे दोन ग्रंथ पांडित्याची कसोटी म्हणून मानले जात, त्यांच्या नकला त्यास करून घेतां येईनात. तेव्हा या पठ्यानें ते दोन महान् ग्रंथ मुखोद्गतच करून टाकले. नंतर वासुदेव सार्वभौम गुप्तपणें काशीस निघून गेला तेथें त्यानें वेदान्ताचें अध्ययन केलें तेथील अध्ययन परिपूर्ण झाल्यावर स्वभूमि नवद्वीप येथें येऊन अध्यापनकार्य आरंभताच दूरदूरचे बुद्धिमान् शिष्य मोठ्या संख्येनें नवद्वीपास एकत्र येऊं लागले आणि वासुदेव सार्वभौमाच्या प्रयत्नानें नव्य न्यायाचें नवे विद्यापीठच तेथें सुरू झालें. इसवी सनाच्या पधराव्या शतकाचा अंत आणि सोळाव्या शतकाचा आरंभ हा वासुदेव सार्वभौम याचा काळ होय बंगालच्या अनेक महापुरुषाच्या गुरुत्वाचा सन्मान प्राप्त करण्याचें भाग्य याना लाभलें नैयायिक-शिरोमणि रघुनंदन, शाक्त तंत्राचा सुप्रसिद्ध विवेचक तांत्रिक कृष्णानंद आणि गौरागप्रभु श्रीचैतन्य हे सर्व सार्वभौम भट्टाचार्य याचेच शिष्य होत

वंगीय नैयायिकामध्यें **रघुनाथ भट्टाचार्य** याच्यासारखा धुरंधर तार्किक कोणी झाला नाहीं इ. स १४७७ मध्यें नवद्वीप येथेच अत्यंत दरिद्री ब्राह्मणकुलात याचा जन्म झाला बालपणींच याची कुशाग्रबुद्धि प्रगट झाली एकदा आईनें चूल पेटविण्यासाठी यास विस्तव आणण्यास सांगितलें विस्तव आणण्यास यानें बरोबर कांहीच साधन घेतलें नव्हतें. विस्तव देणाऱ्या व्यक्तीनें याचक वृत्तीबद्दल धडा देण्याच्या दुष्ट हेतूनें जळता निखारा याच्या हातातच देऊ केला पण या बुद्धिमान् मुलानें झटकन् वाकून जमिनीवरील पसाभर वाळू हातीं घेऊन तिच्यावर तो निखारा स्वीकारला वासुदेव सार्वभौम यानी दुरून ही गोष्ट पाहिली आणि बाल रघुनाथाच्या बुद्धीनें प्रभावित होऊन आपण होऊन त्यास शिकविण्यास आरंभ केला रघुनाथानें दीर्घ परिश्रमानें वासुदेव सार्वभौम यांच्या हाताखालीं अध्ययन केले व नदियाच्या विद्वन्मंडळींकडून 'शिरोमणि' ही उपाधि प्राप्त केली त्यानंतर वासुदेव सार्वभौम यांच्या सागण्यावरून मिथिलेस

जाऊन वृद्ध नैयायिक पक्षधर मिश्र यांचेंहि मार्गदर्शन यानें स्वीकारलें. रघुनाथ शिरोमणि याचा 'दीधिति' नामक ग्रंथ गंगेशाच्या 'तत्त्वचिंतामणी'-वरील विवरणात्मक आणि विवेचनात्मक टीका-ग्रंथ असला तरी कालातरानें मूल ग्रथाप्रमाणेंच पाडित्याची निकषग्रावा बनण्याचा गौरव त्यास प्राप्त झाला तो ग्रंथ रमणीय कल्पना, मूलभूत स्वतंत्र विचार आणि अकुठित करणारा युक्तिवाद याचें भाडारच आहे. पुढें नवद्वीपांत रघुनाथ शिरोमणीचा शिष्य **मथुरानाथ 'तर्कवागीश'** म्हणून कीर्ति पावला. तथापि रघुनाथानतर प्राय: त्याच्याच ग्रंथांवर टीकालेखन सुरू झालें. मथुरानाथ ( १५७० ), जगदीश ( १६२५ ) आणि गदाधर ( १६५० ) याची अशा टीका, ग्रंथकारात प्रामुख्यानें गणना होते यांपैकीं गदाधराची 'गादाधरी-टीका अधिक विद्वन्मान्य झालेली आहे

**विद्यादानाची अखंडित परंपरा :**

अगदीं अलीकडच्या काळापर्यंत येथील ज्ञानदानाची परंपरा अखंडित चालत आली होती, याचें उत्कृष्ट गमक प्रो कॉवेल यानीं केलेल्या वर्णनात आढळते १८६७ सालीं नदियास त्याना काय दिसलें याबद्दल ते लिहितात, " केवळ पाडित्य दाखविणें हा आचार्यांचा हेतु दिसत नव्हता, तर शकाचें निरसन करण्याकडे त्यांचें लक्ष होतें. मोठा श्रोतृसमुदाय समोर जमिनीवरच बसला आहे, आचार्यांचे शब्द ऐकण्यास तो मोठा उत्कठित आहे आणि आचार्य देखील न्यायशास्त्रांतील कोठल्याशा गहन भागाचा कीस पाडून उलगडा करीत आहेत ! माझ्यासारख्या युरोपियनाचें मस्तक ऐकण्यानेंच गरगरूं लागतें, पण श्रोतृवृंद मात्र मोठ्या आनदानें तें ऐकत बसला आहे व आनंद लुटीत आहे ! विद्यार्थ्यांत वयस्कर पिकलीं पानेहि दिसत आहेत ! "

इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकाच्या अगदीं अंतीं म्हणजे नवद्वीप विद्यापीठाच्या अलीकडच्या इतिहासातहि एक मोठा संस्मरणीय प्रसंग घडला आजन्म साहित्यशास्त्राची उपासना करणाऱ्या पंडिताची साहित्य परिषद नवद्वीप येथें भरलेली होती परिषदेचें अध्यक्षस्थान एका प्रौढ वयाच्या महापडिताने भूषित केलें होतें एवढ्यांत एका बावीस वर्षांच्या तेजस्वी

युवकानें सभास्थानीं पदार्पण केलें उच्चस्थानीं विराजमान झालेल्या अध्यक्षाकडे अंगुलिनिर्देश करून ' अध्यक्ष कोण आहेत ? ' यासंबंधी त्यानें बरोबर असलेल्या दुसऱ्या पंडिताजवळ पृच्छा केली अध्यक्षमहाशयांच्या ध्यानींहि त्याचा प्रश्न आला आणि त्यांनी मोठ्या आढ्यतेनें स्वपरिचय पद्यांतच सांगितला —

सत्वरकवितासविता
गौडोऽहं कश्चिदम्बिकादत्तः ॥

हा आत्मश्लाघायुक्त परिचय ऐकतांच त्या तेजस्वी तरुणानेंहि —

गणपतिरिति कविकुलपतिर्
अतिदक्षो दाक्षिणात्योऽहम् ॥

असा पद्यांतच आपला परिचय करून दिला. झालें ! दोघांची काव्यस्पर्धाच सुरू झाली ! कूटप्रश्न, समस्यापूर्ति, श्लोकरचना, काव्य-चर्चा, रसचर्चा या प्रकारचा पांडित्यसंघर्ष सुरू झाला नि सभा मंत्रमुग्ध होऊन ऐकूं लागली ! अखेर तरुण पंडिताचा विजय झाल्याचें परिषदेनें घोषित केलें महापंडित अंबिकादत्तानींहि त्याचा स्वत: गौरव केला आणि नवद्वीपातील सर्वश्रेष्ठ पंडितांनीं त्यास 'काव्यकंठ' ही बहुमानाची पदवी देऊन प्रशंसिलें. नंतरच्या काळांत हाच तेजस्वी तरुण ' मूर्तिमान् वेद-पुरुष ' काचन दैवी विभूति ', ' कविसार्वभौम ' अथवा ' मंत्रमूर्ति ', म्हणून ख्याति पावला पंचविसाहून अधिक संस्कृत ग्रंथाचा कर्ता, योगि-भूषण रमण महर्षींचा सच्छिष्य, महान् दाक्षिणात्य **पंडित वसिष्ठ गणपति मुनि** म्हणजेच तो नवद्वीपानें **'काव्यकंठ'** म्हणून गौरविलेला तरुण पंडित होय

नवद्वीपीय पंडितानी गौरवून दिलेली उपाधि आजहि भारतीय विद्वन्मंडळांत बहुमानाची गणली जात असते.

### श्रीचैतन्यकालीन स्थिति.

अशा प्रकारें अलीकडच्या काळापर्यंत विद्यानगरी म्हणून गाजलेलें नवद्वीप श्रीचैतन्यांच्या काळात विशेषच ख्याति पावलें होतें हें वर

निर्देशिलेंच आहे त्या वेळीं तेथे [redacted] ५० तरी 'टोल' किंवा पाठशाळा होत्या वासुदेव सार्वभौम भारताच्या दूरदूरच्या प्रदेशातून विद्यार्थिवृंदास आकृष्ट करीत होतेच याखेरीज रामचंद्र सार्वभौम, विद्यावागीश, महेश्वर, नीलांबर चक्रवर्ति, अद्वैताचार्य, गंगादास यासारखे सुविख्यात पंडितहि त्याच काळात नवद्वीपाचा कीर्तिसुगंध दूर दूर फैलावीत होते तथापि विद्यादानाहून फारच महत्तर कार्य या भूमीस साधावयाचें होतें.

पांडित्य-प्रदर्शन, शास्त्रार्थ आणि कडाक्याचे वादविवाद यातच कृतकार्यता मानली जात होती ठराविक क्रियाकलापांतच धर्मसर्वस्व आहे, अशी समजूत पंडितांतहि दृढ झालेली दिसत होती जातिजातींत उच्चनीचतेचा, भेदभावनेचा कळस झालेला होता. त्यांतहि बौद्ध आणि शाक्त तान्त्रिकाच्या वामाचारी उपासनेचा मोठाच पगडा बंगालच्या संपूर्ण प्रदेशावर होता. मद्य-मांस-मैथुनादि पंच मकाराच्या उपासनेमुळें हिंसा, अनाचार, व्यभिचार यांना धर्मप्रतिष्ठा मिळून समाजाचे नैतिक बंध पूर्णत: शिथिल झाले होते उच्चवर्णीयांची शुष्कवादपरायणता समाजाचें धार्मिक नेतृत्व करण्यास पूर्णत: असमर्थ होती निम्न जातींतील व खालच्या वर्गांतील जनता उच्चवर्णीयांकडून सदैव अपमानित व तिरस्कृत होत आलेली असल्यानें वामाचाराच्या पंजात सापडत होती सामान्य जनतेच्या अधो-गतीची तर नीट कल्पनाहि करवत नव्हती.

खरें म्हटलें तर, एकमेव भगवत्प्रेमावर अधिष्ठित असलेल्या सर्व-संग्राहक आणि सत्वशील वैष्णव भक्तीचा इसवी सनाच्या दहाव्या शतकातच पूर्वेस उदय झालेला होता भुवनेश्वराचें अनंतवासुदेव-मंदिर त्याच वेळीं उभारले गेलें होतें कृष्णप्रीतीचीं मधुरगीतें गाणारा जयदेव बाराव्या शतकात होऊन गेला होता त्याच्या ' गीत गोविंदा 'बरोबरच चंडिदास आणि विद्यापति ( पंधरावें शतक ) याचीं भक्तिगीतेंहि लोक-प्रिय झालेलीं होतीं पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, सर्वरूढ वामाचारी उपासनेनें सत्त्वशील शुद्ध वैष्णवभक्ति चैतन्यपूर्वकाळात उपहासाचा विषय बनली होती आणि असून नसल्यासारखीच झाली होती अशा भयावह धर्मग्लानीच्या काळांत नवद्वीपाच्या पुण्यपावन भूमीनें श्रीचैतन्य-प्रभूस जन्म दिला आणि लोकोद्धाराचें महान् कार्य सिद्धीस नेलें.

92२००

'नवद्वीप धाम' येथें असलेलीं विविध मंदिरें प्रमुखत: श्रीचैतन्य देवांच्याच पुण्यस्मृति जागवीत असल्यानें त्यांची जीवनलीला त्रोटक रूपानें समजून घेणें आवश्यक आहे.

**चैतन्यप्रभूंचा जन्म :**

श्रीचैतन्यप्रभूंचे पूर्वज मूळचे सिल्हट (आसाम) येथील निवासी. तेथून जगन्नाथ मिश्र संस्कृत विद्येच्या प्राप्तीसाठी नवद्वीपास आले आणि 'पुरंदर' ही पदवी संपादन केल्यावर नवद्वीपातील विख्यात पंडित श्रीनीलांबर चक्रवर्ति यांच्या शचीदेवी नामक कन्येशीं त्यांनी विवाह केला. ते मायापूर मोहोल्ल्यांत घर करून राहूं लागले. या मिश्र दंपतीसच गौरांगप्रभूस जन्म देण्याचें परम भाग्य लाभलें.

श्रीकृष्णचैतन्याचा जन्म १८ फेब्रुवारी १४८६ सालीं फाल्गुनी पौर्णिमेस चंद्रग्रहणाच्या पर्वकालीं झाला. त्या वेळीं संपूर्ण नदिया नगर आणि जगत्पावनी गंगेचे सर्व घाट 'हरि बोल, हरि बोल!' ह्या गजरानें दुमदुमून गेले होते. जणुं हरिसंकीर्तनाच्या भावी महान् कार्याचा बालकाच्या जन्मसमयींच असा सूत्रपात झाला.

**बालपण :**

मुलगा अत्यंत तेजस्वी गौर वर्णाचा असल्यानें नामकरणापूर्वी-पासूनच त्यास गौर किंवा गौरांग संबोधलें जाऊं लागलें. असें सांगतात कीं, गौरांग लहानपणीं अत्यंत रडे. एकदा त्याच्या आईनें त्रस्त होऊन हरिभजन म्हणण्यास आरंभ केला :

> हरि हरि बोल, बोल हरि बोल
> मुकुंद माधव गोविंद बोल ॥

आश्चर्य असें कीं, तत्काळ रडणें थांबवून हा तान्हा मुलगा एकाग्रतेनें ते भजन ऐकूं लागला. तेव्हांपासून त्याचें रडणे थांबण्यास शचीमाता आणि शेजारणी स्त्रिया हाच उपाय अवलंबूं लागल्या.

मुलगा चार महिन्यांचा झाल्यावर त्याचें नामकरण करण्यात आलें आणि जन्मनक्षत्रानुसार 'विश्वंभर' असें नांव ठेवण्यांत आलें. याच वेळीं

मुलाचें स्वभावपरीक्षण करण्यासाठीं त्याच्यापुढें रुपये-पैसे, अन्न-वस्त्र, शस्त्रास्त्रें आणि ग्रंथ ठेवण्याची प्रथा असते त्यानुसार 'विश्वंभरा'चें स्वभाव-परीक्षण चालू असता त्यानें श्रीमद्भागवत ग्रंथावर आपला हात ठेवून आपली रुचि प्रगट केली श्रीचैतन्यांचें जन्मनांव याप्रमाणें विश्वभर असूनहि त्याच्या मातेनें 'निमाई' म्हणून ठेवलेले लाडकें नावच पुढें विशेष प्रचारांत आलें

या निमाईच्या कित्येक चमत्कारपूर्ण बाल-लीला वैष्णवभक्तानीं वर्णिलेल्या आहेत महाभुजंगावर आरोहण करूनहि हा बालक सुरक्षित राहिला मातेस एकदा तेजःपुंज दिव्य पुरुषांकडून पूजिला जात असलेला दिसला. अंगणांत उमटलेलीं त्याचीं पदचिह्नें ध्वजा, वज्र, अंकुश आदि चिह्नानीं अंकित असलेलीं दिसत पायांत नुपूर नसतानाहि त्याच्या चालण्यानें मंजुळ नुपूरध्वनीचा भास होई. सर्व प्रकारें यास नियंत्रणांत ठेवूनाहि कृष्णभक्त सन्याशानें कृष्णास नैवेद्य दाखविण्यास डोळे मिटताच ह्यानेंच अन्नभक्षण केलें. इत्यादि चमत्कारांनीं ह्या बालकाचें अलौकिकत्व चरित्रकारांनीं वर्णिलें आहे याबरोबरच लहानपणीं हा मुलगा कमालीचा हट्टी, दुराग्रही आणि हेकेखोर होता मधून मधून तो इतका त्रागा करी कीं, संतापानें मूर्च्छित होऊन पडे आणि त्यामुळें त्यास पिशाच्चबाधा तर झाली नाहीं ना, अशीहि शंका येई, असेंहि वर्णन आढळतें अर्थात् याहि गोष्टी मुलाची अलौकिकताच एक प्रकारें प्रगट करीत, असें म्हणावयास हरकत नाहीं.

**रूपमाधुरी :**

आपल्या अघटित लीलानीं 'निमाई' सर्वांचीं मनें अंकित करून घेत होताच. पण त्याहिपेक्षा त्याच्या रूपमाधुरीची मोहिनी अशी दिव्य होती कीं, संपर्कांत येणाऱ्या प्रत्येकास ती दास करून सोडी सुगठित सशक्त शरीर, तप्तसुवर्णासारखा दीप्तिमान् गौरवर्ण, रक्तवर्णाचे कोमल हातपाय, कमलासारखी मोहक मुखमुद्रा, विशाल भावपूर्ण आणि चमकते नेत्र, सरल सुंदर नासिका, रेशमाच्या लडीसाहि लाजविणारे कुरळ्या केसांचे काळेभोर आकडे, अंगावर शुभ्र तलम धोतर आणि खांद्यावर पीत वर्णाचें रेशमी उत्तरीय — ह्या बहिरंग शोभेनें बघणाराच्या

नेत्रांचें पारणें फिटे आणि पहाणारास त्याच्या ठिकाणीं दिव्य ईश्वरत्वाचाच साक्षात्कार होई

**विद्याध्ययन :**

निमाईस विश्वरूप नांवाचा थोरला भाऊ होता. तो जितका बुद्धिमान् तितकाच गंभीर आणि विरागी प्रवृत्तीचा होता एके दिवशीं तो गुप्तपणें गृहत्याग करून संन्यासी बनून कायमचा घर सोडून गेला. विद्याध्ययनानेंच त्याच्या ठायीं भक्तिवैराग्याचा उदय झाला, असें समजून जगन्नाथ मिश्रांनीं विश्वंभरास विद्याग्रहणापासून दूर राखण्याचा प्रयत्न केला पण त्यामुळें त्याचा हूडपणा नियंत्रणाबाहेर जाऊ लागला गलिच्छ उकिरड्यावर बसून अंगास घाण फासणें, आधळ्याचें सोंग घेऊन गावभरच नव्हे तर आपल्याहि घरीं भिक्षा मागणें —अशा विक्षिप्त वर्तनानें मातापित्यास यानें विद्यासंस्काराची आवश्यकता दर्शवून दिली.

वयाच्यॉं नवव्या वर्षी त्याचा व्रतबंध झाला आणि पंडित गंगादास वैयाकरण याच्या पाठशाळेंत यानें विद्याध्ययन आरंभलें खेळकर व्रात्य वृत्ति आणि प्रखर बुद्धिमत्ता यामुळें तो विद्यार्थ्यांचें आकर्षण-केंद्रच बनला. एवढ्यांत पं जगन्नाथ मिश्रांचा मृत्यु होऊन या अल्पवयी मुलावर आपल्या घराचा भार पडला. गांभीर्य धारण करून काहीं काल त्याने आपलें अध्ययन तसेंच चालू ठेवलें

**पंडित निमाई :**

अल्पावधींत महाविद्याव्यासंगी पंडित म्हणून निमाईस कीर्ति मिळू लागली या अल्पवयातच यानें व्याकरणवरील ‘ पंची टीका ’ ग्रंथ व त्यावरील ‘ सरल टिप्पणी ’ याची रचना केली अनेक पाठशाळांतून अध्यापनासाठीं त्याच्या ग्रंथांचा उपयोग करण्यांत येऊं लागला त्यानंतर यानें विख्यात पंडित वासुदेव सार्वभौम यांच्या पाठशाळेंत न्यायशास्त्राचे पाठ घेण्यास आरंभ करून न्यायविषयक स्वतंत्र ग्रंथरचनेसाहि आरंभ केला. या वेळीं सार्वभौमाचा पट्टशिष्य रघुनाथ हाहि आपल्या ‘दीधिति’ नामक विख्यात न्यायग्रंथाची रचना करीत होता. निमाई पंडित आणि रघुनाथ यांची दृढ मैत्री जडली होती. निमाई न्यायावर ग्रंथरचना करीत

असल्याचें रघुनाथाच्या ध्यानीं आल्यावर त्यानें तो ग्रंथ ऐकण्याची जिज्ञासा दर्शविली. तेव्हां एके दिवशीं पाठशाळेंतून परतत असतां नौकेंतच निमाईनें आपला ग्रंथ रघुनाथास वाचून दाखविण्यास आरंभ केला. निमाई साभिनिवेशपूर्ण ओघवत्या मधुर वाणीनें ग्रंथ वाचीत चालला असता 'याच्या अद्वितीय ग्रंथापुढें माझ्या ग्रंथाचा काय पाड ! आपल्या ग्रंथानें दिगंत कीर्ति मिळविण्याचें माझें स्वप्न आज धुळीस मिळालें' अशा विचारानें रघुनाथाचें हृदय व्यथित झालें आणि त्याच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले निमाईनें दुःखकारण विचारतांच रघुनाथानें आपली हृदयव्यथा व्यक्त केली तेव्हां त्या क्षणीं "एवढेंच ना ? तुझ्यापुढें माझ्या ग्रंथाची काय किंमत ?" असें म्हणत निमाईनें आपला अद्वितीय ग्रंथ गंगार्पण करून टाकला. मित्रप्रेमासाठीं लोकेषणेचाहि अशा रीतीनें केलेला अपूर्व त्याग महापुरुषांखेरीज अन्य कोणास शक्य आहे ?

या प्रसंगानंतर पाठशाळेंत जाणें बंद करून निमाई पंडितानें जीविकार्जनासाठीं अध्यापनाचें काम करण्याचें योजिलें मुकुंदसंजय यांच्या चंडीमंडपांत किंवा देवीगृहांत निमाई पंडिताची पाठशाळा सुरू झाली आणि अल्पावधींत ही पाठशाळा त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळें, अध्यापन-कौशल्यामुळें आणि सरळ व प्रेमळ वर्तनामुळें पंडित गंगादास यांच्या पाठशाळेहूनहि अधिक ख्याति पावली

**प्रापंचिक पंडित :**

यानंतर नवद्वीपीय पंडित वल्लभाचार्य यांची सुकन्या लक्ष्मीदेवी हिच्याशीं विवाह करून निमाईनीं संसार आरंभला. याप्रमाणें विख्यात पंडित आणि प्रापंचिक गृहस्थ बनल्यावर देखील निमाई पंडिताचा खोडकर चंचल स्वभाव गेला नाहीं. ते विद्यार्थ्यांत मुलांप्रमाणें खेळत, वाटेंत वाटेल त्यास छेडीत, "किं तावत् वैष्णवत्वम् ?" "ऊर्ध्वपुण्ड्र लावल्यानें काय होतें ?" यासारखे प्रश्न विचारून वैष्णव भक्ताची ते फजिती करीत तथापि त्यांच्या अंतरंगीं भक्तीचा अंकुर मात्र सदैव जागा असे.

**ईश्वरपुरी यांचा सहवास :**

माधवेंद्रपुरी यांचे अंतरंगशिष्य ईश्वरपुरी या कृष्णभक्त थोर संन्याशाचें याच सुमारास शांतिपुरास येणें झालें त्या वेळीं ईश्वरपुरींनीं

'श्रीकृष्णलीलामृत' नामक ग्रंथ लिहिला होता त्यातील पदामधले दोष, अशुद्धिस्थानें इत्यादींच्या परिष्करणासाठीं त्यांनीं तो निमाईकडे पंडित या नात्यानें वाचून पहाण्यास देऊं केला. तेव्हां " ज्यांत कृष्णभक्ति आहे, श्रीकृष्णलीला वर्णिल्या आहेत तें पद अशुद्ध असलें तरी शुद्ध होय आणि त्याव्यतिरिक्त पद कितीहि शुद्ध असलें तरी अशुद्ध होय ", असें उत्तर देऊन यांनीं आपल्या विनम्र भक्तिभावनेचें आणि कृष्णमाहात्म्याचें प्रत्यक्ष प्रकटीकरणच केलें या वेळींच यानीं संपूर्ण 'श्रीकृष्णलीलामृत' ग्रंथ ईश्वरपुरींच्या मुखांतून श्रवण केला.

## द्वितीय विवाह :

यानंतर शिष्यांसह निमाईनीं राढ देशाचा — पूर्व बंगालचा प्रवास केला पण इकडे निमाई पंडिताची पत्नी लक्ष्मीदेवी विरहभुजगाच्या दंशामुळें निवर्तली परत आल्यावर आपला शोकावेग आवरून त्यांनीं मातेस धीर देऊन पुन्हा नित्य अध्यापनकार्यास आरंभ केला.

या सुमारास केशवशास्त्री नामक दिग्विजयी काश्मिरी पंडिताचें नवद्वीपास आगमन झालें नवद्वीपीय पंडितास शास्त्रार्थांत पराभूत होण्याची मोठीच भीति निर्माण झाली. परतु नवद्वीपींचा हा युवक पंडित निमाई यानें त्याच्या गंगावर्णनपर काव्यांतील दोष दाखवून देऊन लीलेनें त्यांचें गर्वहरण केलें, यामुळे निमाईची विशेषच कीर्ति झाली

काहीं काळ लोटल्यावर आईच्या आग्रहामुळें नवद्वीपांतील धनाढ्य राजपंडित सनातनमिश्र यांची मुलगी विष्णुप्रिया हिच्याबरोबर निमाईचा द्वितीय विवाह झाला.

## प्रेमस्रोताचा प्रादुर्भाव :

निमाईनीं यानंतर पितृश्राद्धाच्या निमित्तानें गयाधामाची यात्रा केली. या यात्रेनें त्याच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन झालें तेथें पूर्वपरिचित ईश्वरपुरींचें दर्शन होऊन यांच्या ठिकाणीं त्रैलोक्यपावन अद्भुत प्रेमस्रोत जागृत झाला. ईश्वरपुरी यानीं ' गोपीजनवल्लभाय नमः ' या गोपाल-मंत्राची दीक्षा यांस दिली. त्यामुळें गौरांगांची अशी विचित्र दशा झाली कीं, " हा कृष्णा ! " म्हणून आर्त हाक देत आणि " मी व्रजभूमींत

कृष्णाकडे जातों " असें म्हणत हे वृंदावनाच्या दिशेनें उन्मत्ताप्रमाणें धावूं लागले बरोबरच्या लोकानीं मोठ्या यत्नसायासानें नदियास परत आणल्यावर यांच्या नूतन भक्ति-भावाची सर्वत्र चर्चा होऊं लागली.

कृष्णप्रेमानें विव्हल होऊन हे कधीं अतिकरुण आक्रोश करीत, तर कधीं हंसूं लागत. कधीं आनदभरानें बेभान नृत्य करीत, तर कधीं बेहोश होऊन धरणीवर कोसळत

" हे कृष्णा, प्राणप्रिया, प्रियतमा, मला टाकून कोठें निघून गेलास ? बंधूंनो, मला कोणी श्रीकृष्णाची भेट करवा हो ! " असा आक्रोश करीत हे जेव्हा विव्हळ टाहो फोडीत तेव्हां ऐकणारासहि रडूं फुटे. लोकांच्या पायावर लोटागण घालून " माझें दुःख दूर करा हो ! मला श्रीकृष्णास भेटवा ! माझे प्राण त्याच्याविना तडफडत आहेत हो ! " अशी दीन याचना हे करू लागत.

**सामुदायिक संकीर्तनाचा प्रारंभ :**

भक्तिभावाचा हा दिव्य स्रोत उत्तरोत्तर वाढतच गेला महान् पंडित असूनहि लौकिक शास्त्राचा जणुं त्यांस विसरच पडला पाठशाळेंत अध्यापनप्रसंगी विषय बाजूस राहून एकमात्र श्रीकृष्णमहिमान सागण्या-खेरीज याना काहींच सुचेनासें झालें अखेर विद्यार्थ्यांना आपली असमर्थता व्याकुळ वाणीनें सांगून अन्य अध्यापकाकडे जाण्यास यानीं विनंती केली. पण आजवरच्या अध्यापनानें आणि प्रेमानें प्रभावित झालेल्या शिष्यांनीं अन्यत्र जाण्याचें नाकारून आपल्या गुरूंच्या कृष्ण-कीर्तनांतच डुंबत रहावयाचें ठरविलें. तेव्हा त्यांच्या प्रेमास वश होऊन निमाई पंडितांनीं आपल्या हृदयातली विरहज्वाला शात करण्यासाठीं आपल्या छात्रवृंदांस एकस्वरानें श्रीकृष्णाच्या मंगल नामाचें संकीर्तन करण्यास विनविलें आणि

**हरे, हरये नमः, कृष्ण, यादवाय नमः**
**गोपाल गोविंद राम श्रीमधुसूदन ॥**

या नामस्मरणात्मक पदाचें सुस्वर गान करण्यास टाळी पिटून आरंभ केला. सामुदायिक नामसंकीर्तनाचा हाच प्रथमारंभ निमाई पडितांच्या पाठशाळेंतून — मुकुंदसंजयांच्या चंडीमडपातूनच — त्याचा आरंभ झाला

## हरिभक्तीचें आंदोलन :

हलके हलके निमाईंचा सर्व वैष्णवभक्ताशीं परिचय वाढत गेला आणि प्रारंभीं त्याच्या निवासस्थानींच नामसंकीर्तनास भक्तमंडळी जमू लागली पण नंतर श्रीवास पंडिताचें अंगण हेंच भजनकीर्तनाचें स्थान निश्चित झालें तेथें भक्तमंडळी जमून नृत्यगानसंकीर्तनांत रात्र रात्र घालवूं लागली सर्व भक्ताचें केन्द्र निमाईच होते. उत्युच्च घोषांत व वाद्यांच्या गजरात चालणाऱ्या या संकीर्तनानें कोणी प्रभावित होत तर कोणी त्रस्त होऊन निंदा करीत भक्तजनांना निमाईंच्या ठिकाणी ईशत्वाचा साक्षात्कार होऊं लागला आणि ते गौरांगाची भगवद्भावानें उपासना करूं लागले !

याच सुमारास संपूर्ण भारतभ्रमण केलेले आणि माधवेंद्रपुरींच्या-कडून श्रीकृष्णभक्तीची दीक्षा घेतलेले दुसरे दैवी पुरुष **अवधूत नित्यानंद** याचे नवद्वीपास आगमन झालें गौरांगप्रभूंनी अग्रज बंधु म्हणून त्यांचा अंगीकार केला, तर 'श्रीकृष्णावतार' या भावनेनें ते गौरांगप्रभूचे अंकित बनले नित्यानंदाची रूपमाधुरीहि गौरांगप्रभूंच्यासारखीच अलौकिक होती आणि भगवत्प्रेमाहि तसेंच उत्कट होते. त्यामुळें ज्या वेळीं हे दोन्ही महा-पुरुष हातात हात घालून संकीर्तन करीत भगवत्प्रेमानें नाचूं लागत त्या वेळीं नास्तिकातील नास्तिकाचेंहि हृदय भगवत्प्रेमानें आर्द्र होई.

या प्रकारें गौरांगप्रभूंनीं संकीर्तनाच्या स्वरूपात भक्तीचें महान् आंदोलनच आरंभलें. श्रीवास, मुरारिगुप्त, मुकुंददत्त, गदाधर, नित्यानंद इत्यादि भक्तजन संकीर्तनास प्रमुखत्वानें उपस्थित असत. या वेळीं अद्वैताचार्य शांतिपुरास राहून ईश्वरानें प्रकट व्हावें म्हणून प्रतिदिन गंगाजल व तुलसीदल यानीं श्रीकृष्णपूजन करीत होते गौरांगप्रभूंच्या अद्भुत प्रेम-भावाची आणि संकीर्तनाची वार्ता रोजच त्यांच्या कानीं पडत होती. गौरांगप्रभूंच्या रूपानें आपला इष्ट देवच अवतरला असें त्यास वाटू लागलें.

**कलियुगे धर्म हय हरिसंकीर्तन**
**एतदर्थ अवतीर्ण श्रीशचीनंदन**
**एइ कहे भागवत तत्त्व सार**
**कीर्तन निमित्त गौरचंद अवतार**

अशा भावनेनें तेहि भक्तीच्या या महान् आंदोलनांत सक्रिय सामील झाले.

**व्यापक भक्तिप्रचार :**

आरंभीं श्रीवासांच्या अंगणांत बंद जागेंत संकीर्तन होई. पण नंतर गौरांगप्रभूंनीं नित्यानंद व यवनभक्त हरिदास यांना घरोघर जाऊन हरिनामाची भिक्षा मागण्यास सांगितलें आणि घरोघर भक्तीचा संदेश पोंचविण्याचें कार्य करण्यास आरंभ केला या वेळीं जगाई ( जगन्नाथ ) आणि मधाई ( माधव ) हे क्रूरकर्मे ब्राह्मण नवद्वीपाचे कोतवाल होते. एकदा मधाईनें हरिनामाची भिक्षा मागणाऱ्या नित्यानंदावर प्रहार करून त्यास रक्तस्नान घातलें पण नित्यानंदाची तितीक्षा आणि गौरांगप्रभूंचा प्रभाव यामुळें पश्चात्ताप पावून दोघेहि बंधु नम्र भगवद्भक्त बनले गौरांगाचा प्रभाव जसा वाढूं लागला तसा लोक विरोधहि करूं लागले उपद्-व्यापी लोकांच्या प्रेरणेनें नवद्वीपाचा इस्लाम अधिकारी काजी चाँदखाँ यानें संकीर्तनास बंदीच करण्याचें ठरविलें. तेव्हां गौरांगप्रभूंनीं आपल्या भयभीत अनुयायांस धीर दिला आणि निर्भयपणें मोठ्या समुदायासह नगर-संकीर्तन करीत ते काजीच्या घराशीं पोंचले संकीर्तनानें प्रभावित होऊन काजीनें विरोध तर सोडलाच, पण त्यानें गौरांगाच्या पुण्य-दर्शनानें स्वतःसहि धन्य मानलें यानंतर अवघी नवद्वीप नगरी दररोज ' हरि बोल ' गजरानें दुमदुमूं लागली

**संन्यास-ग्रहण :**

वैराग्यविद्यानिजभक्तियोग
शिक्षार्थमेकः पुरुषः पुराणः
श्रीकृष्णचैतन्य शरीरधारी
कृपाम्बुधीयस्तमहं प्रपद्ये ॥

गौरांगांनीं भक्ति-प्रेमाचा महान् आदर्श घालून दिला व हरिसंकीर्तनानें लोकोद्धाराचे थोर कार्यहि आरंभलें. पण तें कार्य अधिक यशस्वीपणें चालविण्यास वैराग्याचाहि आदर्श घालून देणें त्यांस आवश्यक वाटलें. ह्या अवधीपावेतों भक्त त्यांस कृष्णावतार समजून राजसी थाटानें

त्याचीहि उपासना करूं लागले होते. बुद्धिवाद्यांस नेमका त्यामुळेंच वैष्णव भक्तीच्या निंदेस अवसर मिळे. तेव्हां एके रात्रीं वृद्ध माता आणि तरुण पत्नी यांस निद्रित अवस्थेंत सोडून गौरांग बाहेर पडले व रातोरात गंगा पोहून जाऊन कटवा नामक गांवास पोंचले. तेथें स्वामी केशवभारती याच्याकडून त्यांनीं संन्यासदीक्षा घेतली. गौरांगांचें संन्यासाश्रमींचें नाव श्रीकृष्णचैतन्य असें ठेवण्यांत आलें येथून पुढें ते 'चैतन्य' किंवा 'श्रीचैतन्य महाप्रभु या नांवानेंच अधिक ख्यात झाले.

संन्यासग्रहण केल्यावर भगवत्प्रेमाच्या प्रबळ आवेगानें वृंदावनास जाण्याच्या हेतूनें उन्मत्त भ्रमण करीत असतां महाप्रभु शांतिपुरास आले शोकाकुल शचीमाता तेथें भेटण्यास आली असतां या मातृभक्त संन्यासी पुत्राने मातेचें पदवंदन केले. तेव्हां मातेनें कळवळून सांगितले, " आतां आणखी दूर न जातां पुरीस राहूनच संन्यासधर्म चालव म्हणजे मला भक्तांकडून तुझा वृत्तान्त तरी यथासमय मिळत जाईल. " मातेची ही इच्छा गौरांगांनीं प्रमाण मानली

## पुरीनिवास :

येथे प्रभु चैतन्यांची नवद्वीप लीला संपली आणि यानंतर त्यांनीं महाक्षेत्र जगन्नाथपुरीस आपली लीलास्थली बनविलें चैतन्यांचा पुरी-निवास भक्तींच्या प्रसारकार्यास पोषकच झाला संपूर्ण भारतातून जगन्नाथाच्या रथयात्रेस येणारा यात्रिकांचा अमर्याद मेळावा चैतन्यांच्या सामुदायिक विव्हल संकीर्तनानें भक्तिरसांत बुडून जाई आणि प्रत्येक जण भारावून परत जाई.

पुरीस राहिल्यावर बंगालमधील भक्तिकार्याची धुरा चैतन्यानीं अद्वैताचार्य आणि नित्यानंद यांवर सोंपविली स्वतः दक्षिण भारताची आणि तीर्थस्थानांची सहा वर्षेपावेतों यात्रा करून त्यांनीं दक्षिणेंतहि भक्तिप्रचार केला यापूर्वीच चैतन्यानीं वृंदावनाच्या तीर्थोद्धाराच्या कार्यासाठीं आपला सहाध्यायी लोकनाथ यास भूगर्भ आचार्यांस बरोबर देऊन पाठविलें होतें त्यांनींहि तेथें अश्रान्त परिश्रम करून प्राचीन पुण्यस्थलांच्या उद्धाराचें कार्य चालविलें होतें. दक्षिण-यात्रेनंतर चार

वर्षांनीं स्वत: प्रभु अनेक भक्तांसह वृन्दावनाकडे जाण्यास निघाले तेव्हां ते शांतिपुरास आणि नवद्वीपास आले होते हींच त्याची नवद्वीपास अंतिम भेट. याच प्रसगीं मातेला आणि आपली व्यथितहृदया भार्या विष्णुप्रिया हिला त्यांनीं दर्शन-लाभ दिला व विष्णुप्रियेस पादुकादान केलें. ह्या वेळीं प्रभूंची वृंदावन-यात्रा झाली नाही, पण रूप आणि सनातन यांची भेट झाली त्यानींच पुढें वृंदावनात राहून भक्तिशास्त्र आणि भक्त-आचार यांचें प्रणयन करण्याचें महान् कार्य केलें कांहीं कालावधीनंतर प्रभूनीं श्रीकृष्णलीलाधाम वृंदावनाची यात्रा केली व आपल्या जीवनातील चिरवांछित अभिलाषा सफल करून घेतलीच

यानंतरचीं बारा वर्षें प्रभूंचा निवास पुरीसच होता हीं बाराहि वर्षें प्रभु स्वत.स राधा समजून श्रीकृष्णविरहानें अत्यंत तळमळत असत आणि अनेकदां दिव्योन्मादात बेभान असत प्राय: महाप्रभूंच्या तीन दशा पहाण्यांत येत अन्तर्दशा, अर्धबाह्य दशा आणि बाह्य दशा बाह्य दशेंत ते सर्व व्यवहार ठीक करीत, पण बहुताश वेळ अतर्दशेंतच गोपीभावानें वा राधाभावानें श्रीकृष्णविरहांत अश्रु ढाळीत व नाना प्रकारें विलाप करीत. दिव्योन्मादांत कित्येकदां यांनीं समुद्रात उडी घेतली भक्त लोक मोठ्या कष्टानें त्यांना वाचवून वा शोधून आणून साभाळण्याचा प्रयत्न करीत. अखेरीस शके १४५५ च्या आषाढात अशाच दिव्योन्मादांत महाप्रभु श्रीकृष्णचैतन्यांनीं श्रीजगन्नाथाच्या विग्रहांत विलीन होऊन आपल्या अवतारलीलेचें संवरण केलें.

दा. क्र. १२२८०

**नवद्वीपधामांतील पुण्यस्थळें :**

भगवान् चैतन्याच्या आदिलीलेचें स्थान, म्हणून नवद्वीप धाम भक्त-हृदयात वृंदावनाच्या जोडीनें महत्त्व पावलें. चैतन्यांच्या माहात्म्याचें आणि अलौलिक लीलांच्या स्मृतींचें जतन करणारीं किती तरी मंदिरें व पुण्यस्थळे नवद्वीपांत दाखविलीं जातात

**१. धामेश्वर : श्रीगौरांग महाप्रभु मंदिर** – या पुण्यक्षेत्रांतील हे मंदिर मुख्य असून या मंदिरातील मूर्ति प्रभूंची पूर्वाश्रमींची पत्नी विष्णुप्रिया यांनीं स्थापिलेली आहे मूर्ति संपूर्ण मानवाकृतीएवढी

मोठी असून काष्ठनिर्मित आहे पतींनीं दिलेल्या पादुकांच्या पूजनानें आपल्या विरहदग्ध हृदयास सांवरून धरीत असताच विष्णुप्रिया देवीस शचीमातेच्या मृत्यूचें परम दुःख साहावें लागलें आणि त्यांतच एके दिवशीं गौरांगप्रभूंहि लीलासंवरण करून निजधामास गेल्याचा दुःसह वृत्तान्त समजताच विष्णुप्रिया देवींचे जीवनव्यापार प्रायः थाबलेच पण गौरागांचा दृष्टान्त झाला कीं, ' ज्या निंबाच्या वृक्षाखालीं मीं मातेचें स्तनपान केलें त्याखालीं माझी काष्ठमूर्ति स्थापन करा, मी त्यांत येऊन स्थित होईन ' दृष्टान्तानें पुनर्जीवन प्राप्त झालेल्या देवींनीं त्याच निंबाच्या लाकडापासून श्रीचैतन्यांची सुदर मूर्ति तयार करवून पंधरा दिवसांत तिची प्राणप्रतिष्ठा केली. वस्त्रप्रावरणानीं भूषित झालेल्या मूर्तींत त्यास आणि नवद्वीपीय भक्तांस गौरांगांच्या प्रत्यक्ष दर्शनाचें समाधान मिळू लागलें तीच मूर्ति धामेश्वर-मंदिरांत असल्याची भाविकांची श्रद्धा आहे.



श्रीचैतन्यमूर्ति

पूर्वी ही मूर्ति एका साध्या छोट्या मंदिरात होती. पण आतां दिसणारें मंदिर समृद्ध आणि चांगलें प्रशस्त आहे प्रथम शाक्त असलेले पण नतर वैष्णव झालेले मंदिराचे मालक विष्णुप्रियेच्या वडिलाचे — सनातन मिश्रांचे वंशज आहेत मंदिराचें प्रांगण स्वच्छ संगमरवरी फरशीनें बांधलेलें

असून वातावरण प्रसन्न आहे. पण दैवदुर्विलास असा कीं, भक्तीच्या क्षेत्रांत जातपात, भेदाभेद यास पूर्ण तिलांजली देणाऱ्या महाप्रभु गौरांगांचीच येथें पूजा केली जात असूनहि कर्मठ स्पर्शास्पर्श-विचारानें येथील पुजाऱ्यांचीं मनें दूषित झालेलीं आहेत. विशिष्ट वंशाचे ब्राह्मण-गोस्वामी सोडल्यास अन्य ब्राह्मणास देखील मूर्तीस स्पर्श करूं दिला जात नाहीं. शिवाय परस्थ यात्रिकास मंदिरद्वारींच कांहीं किमान द्रव्यभेट चढविल्याखेरीज प्रांगणात प्रवेशहि मिळत नाहीं ! नवद्वीपांतील बहुतेक मंदिरांतून याप्रमाणेंच दक्षिणा दिल्याखेरीज देवदर्शन होतच नाहीं ! धर्माच्या नावाखालीं चालणाऱ्या या व्यापारी वृत्तीमुळें निर्धन भाविकाचीं हृदयें किती खिन्न होत असतील, याची कल्पनाच केलेली बरी.

**२. सोनार गौरांग :** या मंदिरात गौरांगाची सुवर्णमूर्ति असल्यानें त्यास 'सोनार (सुवर्णमय) गौरांग' म्हटलें जातें. हें मंदिरहि येथील प्रमुख मंदिरांत मोडतें पण येथील पुजारी-गोस्वामींची धामेश्वर-मंदिराशीं एक प्रकारची अनिष्ट स्पर्धा चालते. 'महाप्रभूर बारी' या नावानें धामेश्वर-मंदिर ओळखलें जात असताहि ; हेंच सोनार गौरांग-मंदिर खरी महाप्रभू बारी असल्याचें सांगून यात्रिकाची दिशाभूल केली जाते हें मंदिर गौरांगांचे उजवे हात श्रीनित्यानंद किंवा निताई याच्या वंशजाच्या मालकीचें आहे

**३. शचीमाता-विष्णुप्रिया-मंदिर :** येथें गौरांगप्रभूंची विद्ध-हृदया वत्सल माता आणि पतिपरायण विरहदग्धा पत्नी या दोघींच्या मूर्ति असल्यामुळें भाविक स्त्रियांस आणि गौरांगप्रभूंच्या भक्तास हें मंदिर परम आदरणीय झालें आहे. अद्वैताचार्यांसारखे श्रेष्ठ वैष्णवहि शचीमातेकडे जगन्मातेच्या भावनेनें पहात.

> **जननी जने तो भक्त जनी, या दाता या शूर।**
> **नांहि तो जननी वांझ रहे, क्यों खोवें है नूर॥**

या वचनानुसार गौरांगप्रभूस जन्म देऊन शचीमातेनेंच माता शब्द सार्थक केला पुत्रांतील अलौकिक दिव्यत्वाची बालपणापासून प्रचीति आली असतां आणि भक्तसमुदाय त्याची भगवद्भावानें उपासना करूं

लागला असतांहि शचीमातेची वत्सल भावनाच उत्कट राहिली. त्यामुळें गौरागांनीं संन्यास घेतल्यावर शचीदेवीस परमावधीचें दुःख झालें. गृहत्याग करून गेलेल्या प्रथम पुत्राचा पत्ता नाहीं, वैधव्याची कुऱ्हाड कपाळीं कोसळली आणि त्यांत पुत्रहीन तरुण सुनेस तिच्यावर सोंपवून गौरागानी सन्यास घेतला ! पण संन्यास घेतल्यावर मात्र मातृहृदयाचें सारें दुःख दाबून या धर्मज्ञ मातेनें त्यास घरीं रहाण्यास न सागता पुरीस राहून संन्यासधर्माचें पालन करण्यास सागितलें. पुरीहून भक्तासमवेत मिळणाऱ्या पुत्रवार्तेच्या आधारानें जीवन कंठणाऱ्या या जर्जर वृद्धेनें एके दिवशीं विष्णुप्रियेच्या आधारानें पुण्यतोया भागीरथीचा कांठ गाठला आणि विष्णुप्रियेचा हात हातांत घेऊन देह ठेवला

विष्णुप्रियेच्या त्यागास आणि खडतर वैराग्यास तर तोड नाहीं. गौतमबुद्धाची पत्नी यशोधरा हिच्यापेक्षांहि दुःसह दुःख विष्णुप्रियेस साहावें लागलें. यशोधरेस पुत्रलाभ तरी झालेला होता. अवघें नगर संन्यासी श्रीचैतन्यांच्या दर्शनाचा लाभ घेऊं शकत असता त्याच्या या एकांतिक उपासिकेस मात्र धर्मानें दर्शनाधिकार नाकारला होता. दहा वर्षांच्या तपस्येनंतर तिला प्रभूंचें दर्शन झालें आणि पादुकांच्या रूपानें जीवनाधार प्राप्त झाला वैष्णव भक्तीच्या पतीच्या उपदेशास उत्तर देतांना “ आपणाखेरीज अन्य कोणी देवास मी विष्णु म्हणून ओळखीत नाहीं ! ” असें या पतिव्रतेनें म्हटलें होतें. पतीच्या विरहकालांत आमरण कठोर उपासनेंत विष्णुप्रियेनें जीवन व्यतीत केलें. प्रातःकालापासून तिसऱ्या प्रहरापर्यंत षोडष नाममंत्राचा जप करावयाचा एका मंत्राच्या उच्चारणानंतर एक अक्षता पात्रात टाकावयाची व जपसमाप्ति झाल्यावर जमलेल्या अक्षताचाच फक्त भात शिजवून भगवतास अर्पण करून प्रसाद म्हणून ग्रहण करावयाचा, अशी खडतर तपस्या यानीं केली चैतन्याच्या अवतारसमाप्तीनंतर त्यांच्या काष्ठप्रतिमेची उपासना करीत असता फाल्गुनी पौर्णिमेस प्रभूंच्या जन्मतिथीसच या प्रभुविग्रहात विलीन झाल्या यांस भगवंतांची महामाया मानून भक्त वंदन करतात


**गौरशक्तिं महामायां नवद्वीपनिवासिनीम् ।**
**विष्णुप्रियां सतीं साध्वीं तां देवीं प्रणतोऽस्म्यहम् ॥**

तरीहि शचीमाता-विष्णुप्रिया-मंदिरांत या दोन साध्वींचें दर्शन घेतांना त्यांच्या जीवनातील आत्यंतिक कारुण्याचें स्मरण होऊन मनास तीव्र वेदना झाल्याविना राहात नाहींत.

**४. श्रीवास-प्रांगण :** श्रीचैतन्यप्रभूंपासून जीवन लाभलेल्या पावन भक्तिगंगेची गंगोत्री म्हणजे श्रीवास-अंगण. गयाधामाच्या यात्रेनंतर अल्पावधींतच हरिसकीर्तनाचें केन्द्र बनलेली येथील जागा नजीकच्या वास्तूंसह, श्रीवासाच्या व गौरांगांच्या घरासह भागीरथीनें आत्मसात् केलेली असली तरी अंगणाची जागा दाखविण्यात येतेंच आज या जागेंत चैतन्याच्या 'विरागी' अनुयायाचा प्रसिद्ध 'आखाडा' असून नित्यानंदांचे वंशज गोस्वामी त्याचे धनी आहेत या आखाड्यात श्रीचैतन्यप्रभूंचीच मूर्ति उपासिली जाते. नवद्वीपांतील चैतन्यलीलेचा विचार केल्यास हरिसंकीर्तनानें इतकें पावन झालेलें दुसरे स्थान दाखविता येणार नाहीं. सामान्यतः चैतन्य संप्रदायाचा प्रत्येक आखाडा कोणत्या ना कोणत्या सांप्रदायिक मंदिराशीं संलग्न असतो तथापि येथील 'आखाडा' स्थानाच्या स्वयंसिद्ध माहात्म्यामुळेंच श्रेष्ठत्व पावला आहे नित्यानंदांचें नवद्वीपांत आगमन झाल्यावर श्रीवासांचे घरच त्याचें निवासस्थान होतें श्रीवास पंडित प्रभूंच्या पित्यांचे परमस्नेही आणि महान् भगवद्भक्त होते. त्यांच्या पत्नी मालती याहि शचीमातेच्या स्नेहभाजन होत्या या ईश्वरपरायण प्रेमळ दांपत्यानें नवद्वीपीय सर्वच भक्तमंडळींवर वात्सल्याचें निरंतर छत्र धरलें यवनभक्त हरिदास आणि नित्यानंद त्यांच्याच आश्रयास राहिले होते गोड भक्तिगीतांनी — मृदंग ( खोळ ) आणि करताल यांच्या वाद्यध्वनींनीं आणि नामसंकीर्तनांनीं हें स्थान साडेचारशें वर्षें नियमितपणें निनादित होत आलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही

**५. बडा आखाडा आणि अन्य आखाडे** — नवद्वीपातील सर्वांत मोठा आखाडा बडा आखाडा म्हणून प्रसिद्ध आहे. पंचवीस-तीस विरागींना आश्रय देण्याइतपत मोठें दहा-बारा आखाडे नवद्वीपात असून अनेक लहान आखाडे मंदिरा-मंदिरापाशीं संलग्न आहेत. आखाड्यातून सामान्यतः गौर-निताई आणि राधाकृष्ण यांच्या मूर्तींचे पूजन होतें ' बडा आखाडा ' या ठिकाणीं चैतन्यांऐवजीं श्रीकृष्णाचीच पूजा केली जाते.

साधारण मोठ्या असलेल्या प्रत्येक आखाड्यात मोकळें अंगण वा फरशी केलेली, छपरानें आच्छादलेली जागा कीर्तनासाठी राखून ठेवलेली



बडा आखाडा

असते. आखाड्यात प्रसंगोपात्त सार्वजनिक संकीर्तन होतेंच. एरवीं श्रीभागवतपुराण, श्रीचैतन्यचरितामृत या ग्रंथाचें वाचन चालते आखाड्याच्या महंताच्या पुण्यतिथीसारख्या प्रसंगीं 'महोत्सव' साजरा करण्यात येतो आणि त्या वेळीं भक्तजनास मोठें मिष्टान्न भोजन देण्यांत येतें आखाड्यांतील पूजेंत प्रथम गुरुपूजा, नंतर चैतन्यपूजा आणि नंतर राधाकृष्णपूजा असा सामान्यत: क्रम असतो आखाड्याचे महंत हे भैरवधारी विरागी असतात आणि त्यानाच इतरास 'भैरव' नामक दीक्षा देण्याचा अधिकार असतो

**६. श्रीनित्यानंद-मंदिर :** नित्यानंदांस चैतन्यसंप्रदायी कृष्णाग्रज बलरामाचा अवतार समजतात चैतन्यप्रणीत भक्तिकार्याच्या प्रसाराचें श्रेय नित्यानंदांसच सर्वाधिक आहे हे जणुं चैतन्यप्रभूंचे बहिश्चर प्राणच होते प्रभु यांस गृहत्याग केलेले अग्रज बंधु विश्वरूप याच्या ठिकाणी मानीत गौरभक्तांत संकीर्तनांत प्रारंभीं निताई ( नित्यानंद ) याचेच नांव प्रथम येतें.

भजो निताई-गौर राधेश्याम ।
जपो हरे कृष्ण ! हरे राम ॥

बंगालमध्ये अनेक चैतन्य-मंदिरातून निताईचीहि मूर्ति पूजिली जाते. नवद्वीप येथील या मंदिरात श्रीनित्यानंदाची स्वतंत्र मूर्ति असून गौरांगांच्या द्वितीय विग्रहाच्या श्रद्धेनें तिचें पूजन केलें जातें

नित्यानन्दमहं वन्दे कर्णे लंबितमौक्तिकम् ।
चैतन्याग्रजरूपेण पवित्रीकृतभूतलम् ॥

या श्लोकात चैतन्याच्या अग्रज स्वरूपांत त्यास वंदन केले आहे चैतन्यचरिताच्या अनुषगानें यांच्या रूपमाधुरीचें वर्णन दिलें आहेच प्रभु चैतन्यांनीं पुरीस निवास केल्यावर राढ देशीं भगवन्नामप्रचाराचें कार्य नित्यानंदांवरच सोंपविलें तें कार्य त्यानीं फारच व्यापक प्रमाणावर सिद्धीस नेलें. आणि हीन जाति आणि जातिहीन सर्वांस भक्तिगंगेचा प्रवाह मुक्त करून देऊन अवघियांपुरतें ओसंडलें पात्र' या उक्तीची सार्थकता बंगाल देशांत सिद्ध केली पुढें प्रापचिकास निष्काम प्रभुसेवेचा आणि हरिभक्तीचा आदर्श घालून देण्यासाठीं महाप्रभूच्या आज्ञेनें यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला. याच्या वंशजांनींहि वैष्णव भक्तीच्या प्रसारांत फारच मोठा कार्यभाग उचलला

**७. नित्यानंद-मीलन :** या मंदिरात गौरांगप्रभूनीं नंदन आचार्यांच्या घरीं नित्यानंदाची प्रथम भेट घेतली त्या महत्त्वपूर्ण प्रसगाची लीला दर्शविली आहे. गौरागांच्या दर्शनानें नित्यानद निर्निमेष दृष्टि लावून संज्ञाहीन स्थिति पावले असतां प्रभूंच्या सकेतावरून श्रीवास पंडितानीं भागवतातील पुढील श्लोक गायिला —

बर्हापीडं नटवरवपुः कर्णयोः कर्णिकारं
बिभ्रद्वासः कनककपिशं वैजयंतीञ्च मालाम् ।
रन्ध्रान्वेणोरधरसुधया पूरयन्गोपवृन्दै —
र्वृन्दारण्यं स्वपदरमणं प्राविशद्गीतकीर्तिः ॥

अवधूतशिरोमणि शुकदेवानाहि ज्या श्लोकानें मोहिनी घातली, तो हा श्रीकृष्णाच्या गोपवेशाच्या माधुरीचें वर्णन करणारा श्लोक ऐकून नित्यानंद प्रथम मूर्च्छित झाले व नंतर प्रेमोन्मादानें नृत्य करूं लागले

तेव्हा प्रेमभरानें गौरांगांनीं त्यांस दृढालिंगन दिलें. ह्या दोन महापुरुषाच्या मीलनाचा हा प्रसंग या मंदिरांत मनासमोर साकार झाल्याविना रहात नाहीं हा सर्व प्रसंग ज्या भाग्यवंताच्या घरीं घडला, त्या नदन आचार्यांचें चैतन्यांच्या उत्तरजीवनात महत्त्वाचें स्थान आहे. पुरी-निवासांत नंदनाचार्यांनीं प्रभूची अत्यत पतिपरायण पत्नीहूनहि जास्त काळजी घेतली म्हणून नंदनाचार्यांना भक्त सत्यभामेचा अवतार समजतात.

**८. श्रीअद्वैताचार्य-मंदिर :** श्रीचैतन्यांच्या भक्तिमंदिराचे सर्वांत दृढतर आधारस्तंभ अद्वैताचार्य. याचें या मंदिरांत दर्शन घेतलें कीं, चैतन्यांचा अवतार याच्याच तपस्येचें आणि कृष्णोपासनेचें फळ असल्याचें स्मरण होऊन मस्तक विशेष विनम्र होतें. चैतन्याच्या आविर्भावापूर्वीपासून वैष्णव भक्तांचें केंद्र बनलेले अद्वैताचार्य वयानें गौरांगांच्या वडिलांप्रमाणें होते. विश्वरूपांचे तर ते साक्षात् गुरुच होते पण गौरांगांच्या ठिकाणीं भगवद्भाव ठेवून प्रभूंची चरणधूळ ते मस्तकीं धारण करीत. अद्वैताचार्यांच्या निर्मल आदर्शामुळेंच चैतन्यभक्तात भक्तिवैराग्याचें संरक्षण होण्यास मदत झाली

वर वर्णिलेल्या मंदिरांखेरीज चैतन्यसबद्ध आणखी तीस-पस्तीस मंदिरें नवद्वीप धाम येथें आहेत. त्यातील बरींचशी चैतन्याच्या विविध लीलांचें दर्शन घडविणाऱ्या मातीच्या मूर्तींनीं युक्त आहेत काहींचीं केवळ नांवें पुढें दिली आहेत

९ गौरांगजन्मलीला, १० गौरागबाल्यलीला, ११ गौरांग-विवाहलीला, १२ जगाई-मधाई-उद्धार, १३. श्रीगौरगोविंदमंदिर, १४ गदाधर अंगण, १५. गुप्तवृन्दावन आणि पंचतत्त्व, १६. महाप्रभूंची ढोलवाडी, १७ हरिसभा आणि हरिभक्तिप्रदायिनी सभा, १८ षड्भुज गौराग अथवा वैकुठधाम, १९ विश्वरूप-गौराग २० श्रीमहाप्रभुचा भीटा, २१ छोटा आखाडा, २२ बलदेव आखाडा, २३ श्रीगोविंदजी-मंदिर, २४ पुरी-गंभीरामठ, २५. श्रीवृन्दावनचंद्र, २६. सोनार निताई-गौर, २७ श्रीगौर-विष्णुप्रिया, २८. गदाधर-संगम इत्यादि.

यांखेरीज नवद्वीपाची अधीश्वरी देवता **पोडामाता, सिद्धेश्वरी आणि वृद्ध शिव** हीं दोन मंदिरें विशेष महत्त्वाची मानलीं जातात

## परिसरांतील पुण्यस्थळें :

**मायापूर :** भागीरथीच्या पैल तीरावरील गौडीय मठाचें मायापुर हें मुख्य स्थान असून मठानुयायी ह्यास नवद्वीप धाम मानतात येथील **श्रीयोग-पीठ** हें मुख्य मंदिर श्रीचैतन्यप्रभूच्या आविर्भावाचें स्थळ समजण्यांत येतें. मायापुरातहि **श्रीवास अंगण** दाखविण्यांत येतें येथील अन्य पुण्यस्थानें व मंदिरें : श्रीअद्वैत-मंदिर, श्रीचैतन्यमठ, श्रीमुरारिगुप्ताचें सीताराम-मंदिर आणि राधाकृष्ण-मंदिर इत्यादि सांगतां येतील बल्लाळ दिघी अथवा पृथुकुंड मायापुरातच असल्याचें मागें सांगितलें आहेच.

**जन्हुनगर** — नवद्वीपाजवळील या स्थळीं जन्हु मुनींचें स्थान दाखविण्यांत येतें. जन्हु ऋषींनीं संपूर्ण गंगा प्राशन करून पुन्हा जघेंतून विमुक्त केल्याची घटना येथेंच घडली, असें भक्तगण समजतात

**सीमंत द्वीप** — मायापुराजवळील या स्थानीं सीमंतनी देवीचें मंदिर असून याच ठिकाणीं शरडाँगामध्यें असलेल्या जगन्नाथ-मंदिरांत पुरीच्या मंदिराप्रमाणेंच श्रीकृष्ण, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्ति आहेत.

**गोद्रुम द्वीप** — या द्वीपातील सुरभिकुंज नामक एक महान् अश्वत्थ वृक्ष एक गौरलीलास्थल मानण्यांत येतो या द्वीपातच गौडीय मठसंस्थापक श्रीभक्तिविनोद ठाकूर याचें समाधि-मंदिर आहे

**हरिहर क्षेत्र** — अलकनंदा नदीच्या पश्चिमेस गंडकीच्या किनाऱ्या-वरील हें ठिकाण पुण्यक्षेत्र समजलें जातें.

**महावाराणशी** — हरिहर क्षेत्राजवळ हें स्थान असून येथें श्रीशिवपार्वती-मंदिर आहे

**देवपाडा** ( देवपल्ली ) — येथें नृसिंह-मंदिर असून भगवान् नृसिंहांनीं हिरण्यकशिपु-वधानंतर येथें विश्रांति घेतली, असें सांगण्यात येतें

**माजिदा** ( मध्यद्वीप ) — यास सप्तर्षींचें भजनस्थल समजलें जातें. कारण येथें सात ऋषींच्या नावानें सात टेकड्या दाखविल्या जातात. या सात टेकड्याच्या दक्षिणेस वहाणाऱ्या जलधारेस गौरभक्त गोमती म्हणतात आणि तिच्या किनाऱ्यास नैमिषारण्य मानतात. त्यांची श्रद्धा आहे कीं, शौनकादि ऋषि येथें भविष्यकालीं 'चैतन्यभागवत' श्रवण करतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.
अनुक्रम
दि:

**चाँपाहाटी** – येथें गौरगदाधर मठ आहे. या स्थानाबाबत अशी एक लोककथा आहे कीं, येथें द्वापरयुगांत समुद्रसेन राजाची राजधानी होती युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञाच्या वेळीं दिग्विजय करीत आलेल्या भीमास समुद्रसेन राजानें महा संकटात टाकलें पण त्याच्या संरक्षणास श्रीकृष्ण प्रगट होतांच त्यानें भीमाचा सत्कार केला

**शांतिपूर** – नवद्वीपापासून बारा मैलांवर शांतिपूर हें प्रसिद्ध क्षेत्रस्थान आहे श्रीअद्वैताचार्यांचा येथें निवास होता. आज शांतिपूर गौडीय वैष्णवाचें श्रीपीठ म्हणून प्रसिद्ध आहे अद्वैताचार्यांस गौडीय वैष्णव शंकराचा अवतार समजतात. येथें अनेक शिव-मंदिरें असून बाजारपेठेंत महाकालीची अत्यंत विशाल मूर्ति आहे

**कटवा** – हें गांव नवद्वीपाहून चोवीस मैल दूर असून चैतन्यांच्या संन्यासग्रहणाचें स्थळ म्हणून प्रसिद्धि पावलें आहे येथें महाप्रभु चैतन्यांचें मंदिर असून तें गौडीय वैष्णवांचें एक तीर्थक्षेत्र आहे.

याप्रमाणें नवद्वीप आणि त्याचा बराच मोठा परिसर अनेक पुण्यस्थळांनीं गजबजलेला आहे.

<u>यात्रामहोत्सवादि :</u>

१. **गौरांग-जन्मोत्सव :** फाल्गुनी पौर्णिमेस **दोलयात्रा** आणि गौरांगजन्म हे दोन्ही उत्सव येत असल्यामुळें या वेळीं तीन-चार दिवसांची मोठी जत्रा ( मेळा ) भरते. सर्व चैतन्य-मंदिरांतून उत्सव साजरा होतो. चैतन्यलीलेशीं संबद्ध एकूण एक स्थानांची **परिक्रमा** करणें ह्याच प्रसंगी महापुण्यप्रद समजतात. ही परिक्रमा चार किंवा पाच दिवसांत पूर्ण होऊं शकते.

२. **रासयात्रा :** कार्तिकांत येणारा हा उत्सव सर्वांत अधिक लोकप्रिय असून दूरदूरच्या ठिकाणाहून चैतन्यानुयायी विरागींचे समुदाय आणि अन्य भक्तांचे समुदाय येथें एकत्र होतात तीन रात्री सामूहिक नृत्यगीताच्या जल्लोशांत घालविल्या जातात वृंदावनांतील रासक्रीडेच्या स्मरणार्थ हा उत्सव मोठ्या उल्हासानें साजरा होतो. या प्रसंगीं खोळ – मृदंग आणि झांज – करताल यांच्या प्रचंड कल्लोळध्वनीबरोबर सामूहिक नृत्यसंकीर्तनांत बेहोश होणारे भक्तसमुदाय चैतन्यकालीन उद्दाम संकीर्तनाची आठवण देतात.

या दोन उत्सवाखेरीज कृष्णजन्माष्टमी, रथयात्रा, झूलनयात्रा ( श्रावण ) आणि राधाष्टमी ( भाद्रपद ) हे उत्सवहि मोठ्या उत्साहानें साजरे होतात.

**३. महोत्सव :** महोत्सव शब्द सामान्यत: सार्वजनिक मिष्टान्न-भोजन-समारंभासहित साजरा होणाऱ्या कोणत्याहि उत्सवास लावतात त्या त्या मठाच्या वा आखाड्याच्या महंताच्या पुण्यतिथीपासून कोणत्याहि नैमित्तिक प्रसंगापर्यंत अनेकदां महोत्सव साजरे केले जातात.



चैतन्य-संप्रदायांतील बाऊल वैरागी जोडपें

अशा अनेक उत्सवप्रसंगीं भक्तजनांचे प्रचंड मेळे भरून 'हरि बोल, हरि बोल' गजरानें आजहि नवद्वीप धाम निनादित होतें नवद्वीपाप्रमाणें चैतन्याचीं व राधाकृष्णांचीं मंदिरें साऱ्या बंगाल आणि ओरिसांत विखुरलेलीं आहेत

### श्रीचैतन्यपूजा :

आपल्या जीवितकालांत प्रभु चैतन्य कृष्णावतार म्हणून प्रसिद्धि पावले. पण त्याच्या मूर्तींच्या पूजनास व्यापक प्रमाणात कधीं आरंभ झाला, हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे. या कार्यांत वंशीदास आणि नरहरि सरकार यांचें नाव उल्लेखनीय आहे वंशीदासानें चैतन्यांच्या

मूर्तिपूजेचा प्रचार केला चैतन्याच्या निर्याणानंतर यानेंच विष्णुप्रिया-देवीसाठीं चैतन्याची काष्ठमूर्ति बनविली यानंतर नरहरि सरकार यानें चैतन्यविषयक अनेक भक्तिरसपूर्ण पदांची रचना केली आणि चैतन्याच्या पूजाविधीस व्यवस्थित रूप दिलें

**श्रीचैतन्य-संप्रदाय** – चैतन्यांचा भक्तिमार्ग चैतन्यमत किंवा चैतन्य-संप्रदाय या नांवानें वृद्धिंगत झाला स्वतः महाप्रभु चैतन्य, नित्यानंद आणि अद्वैताचार्य हे सप्रदायाचे प्रधान स्तभ असले तरी त्याच्या खालोखाल सहा गोस्वामींचें कार्य संप्रदायाच्या इतिहासांत अत्यत महत्त्वपूर्ण मानलें जातें. या सहा गोस्मामींचीं नावें अशीं आहेत : रूप, सनातन, रघुनाथदास, रघुनाथभट्ट, गोपाळभट्ट आणि जीव गोस्वामी. चैतन्यांनीं संप्रदायास मार्गदर्शन करणारें लेखन स्वतः काहींच केलें नाहीं पण या गोस्वामींच्या प्रयत्नानें संप्रदायाचें तत्त्वज्ञान आणि आचारमार्ग याचें व्यवस्थापन झालें हें कार्य मात्र वृंदावन येथून करण्यांत आलें. चैतन्यमताचें सार पुढील श्लोकात सुंदरपणे ग्रथित झालेलें आहे :

**आराध्यो भगवान् व्रजेशतनयस्तद्धाम वृंदावनम् ।**
**रम्या काचिदुपासना व्रजवधूवर्गेण या कल्पिता ॥**
**शास्त्रं भागवतं प्रमाणममलं प्रेमा पुमर्थो महान् ।**
**श्रीचैतन्यमहाप्रभोर्मतमिदं तत्रादरो नः परः ॥**

ग्रंथ दा. क्र. १२२०९

श्रीमद्भागवत ग्रंथास प्रमाण शास्त्रग्रंथ म्हणून संप्रदायांत आदर असला तर त्याच्या जोडीनें कृष्णदास कविराज यांचा ‘ चैतन्यचरितामृत ’ ग्रंथ श्रेष्ठतम ग्रंथ समजला जातो. ‘श्रीचैतन्याष्टक’ म्हणून चैतन्य-रचित केवळ आठ श्लोक मात्र उपलब्ध आहेत चैतन्याची दुसरी कोणतीच रचना उपलब्ध नाहीं.

प्रभु चैतन्यासारखें भक्तिप्रेम मानवजातीनें कधींच पाहिलें नाहीं. सॅफो, मीरा, हेलॉईस आणि लैला यांची प्रीति म्हणजे चैतन्यांच्या प्रीतीचे केवळ क्षीण पडसाद ! आपल्या प्रियतमाची एवढी निरंतर प्रीति-वेदना कोणींच अनुभवली नसेल त्याच्याच शब्दांत भगवान् श्रीकृष्णाची प्रार्थना करूं या :

**नयनं गलदश्रुधारया । वदनं गद्गदरुद्धया गिरा ॥**
**पुलकैर्निचितं वपुः कदा । तव नामग्रहणे भविष्यति ॥**

♣ ♣ ♣


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

REFBK-0012200

# सांस्कृतिक भारत दर्शन

## पहिला संच : पांच पुस्तकें : ४ रुपये

१. जागृत जगन्नाथ
जगन्नाथपुरी

२. क्षिप्रेच्या सोनेरी स्मृति
उज्जयिनी

३. त्रिभुवनेश्वर लिंगराज
भुवनेश्वर

४. भगवान कोणादित्य
सूर्यक्षेत्र कोणार्क

५. श्रीचैतन्य-लीलाधाम
नवद्वीप

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

आसेतु हिमाचल पसरलेल्या विशाल
भारत भूमींतील संस्कृति-केन्द्रांचा
सविस्तर, साधार, सचित्र परिचय.
*पन्नास पुस्तकांचा विराट् संकल्प*

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा लिमिटेड, मुंबई २